# न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, सिरोंचा यांचे न्यायालय

(पिठासीन अधिकारी उन्मेश बा. श्रीराम)

## नियमित फौजदारी मामला क्रमांक ६८/२०२५

निशाणी क्र.२१

**बायक्का चंद्रय्या सिडाम,**
वय- ३७ वर्षे, धंदा- गृहिणी,
रा. देचलीपेठा, तह. अहेरी,
जि. गडचिरोली. ... **अर्जदार**

- **विरुद्ध** -

**तपासी अधिकारी,**
पोलीस स्टेशन, देचलीपेठा,
तह अहेरी, जिल्हा-गडचिरोली. ...**गैरअर्जदार**

---

**उपस्थिती :-** श्री.एस. आर. तोटावार, अर्जदारा तर्फे विधिज्ञ.
गैरअर्जदारा तर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता- रिक्त.

---

**अपराध क्र.०२/२०२५, पोलीस स्टेशन, देचलीपेठा या गुन्ह्यामध्ये गैरअर्जदाराने जप्त केलेली रोख रक्कम रुपये ३३,०००/- (अक्षरी तेहत्तीस हजार रुपये) सुप्रतनाम्या वर मिळण्या बाबत कलम ४९७ भा.ना.सु.सं. अन्वये अर्ज.**

### आदेश निशानी क्र.२१ वर

(दिनांक ०४/०४/२०२६)

**०१.** अर्जदार नामे बायक्का चंद्रय्या सिडाम, रा. देचलीपेठा, तह. अहेरी, जि. गडचिरोली यांनी अपराध क्र. ०२/२०२५ मध्ये भारतीय दंड संहितेच्या कलम ४०९, ४२०, ४६८ अन्वये जप्त रक्कम परत मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. जप्त रक्कम खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | रक्कमेची माहिती |
|---|---|
| (१) | रोख रक्कम एकुण ३३,०००/- रुपये. |

वर नमुद रक्कम सुप्रतनाम्यावर मिळण्यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम ४९७ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

**०२.** अर्जदार यांनी वरील रक्कम त्यांच्या मालकीचे असल्याचे म्हटले आहे. सदर रक्कम पोलीस स्टेशन, देचलीपेठा यांनी जप्त केलेले आहे. अर्जदाराने आवश्यक ते कागदपत्र दाखल केल्याचे म्हटले आहे व न्यायालय लादेल त्या अटीवर अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

**०३.** सदर अर्जावर सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी नि.क्र.२१ वर व तपासी अधिकारी यांनी खुलासा नि.क्र.२७ सादर केला. तपासी अधिकारी यांनी त्यांच्या खुलासा मध्ये रक्कम जप्त असल्याचे मान्य केले आहे. सदर रक्कम योग्य त्या अटी शर्तीवर ती अर्जदारास परत करणेविषयी काही हरकत नसल्याचे त्यांनी कथन केले आहे.

**०४.** प्रस्तुत मुद्देमाल हा रोख रक्कम असल्याने व ती आरोपीच्या ताब्यातुन जप्त झाल्याने, या न्यायालयाने प्रस्तुत प्रकरणात आरोपीचे म्हणणे मागितले. प्रकरणातील आरोपी नामे धनजंय प्रभाकर गावीत याने नि.क्र.२९ वर आपले म्हणणे सादर करत सदर रक्कम अर्जदारास सुप्रतनाम्यावर देण्याविषयी आक्षेप नसल्याचे कथन केले आहे.

**०५.** सदरच्या प्रकरणात अर्जदाराने अर्जासोबत नमुद रक्कम सोडविण्या करीता अर्जदाराच्या आधारकार्डाची पडताळीत प्रत दाखल आहे. सदर प्रकरणातील एफ.आय.आर. मधील मजकूराचे अवलोकन केले असता अर्जदार यांनी सदर रक्कम आरोपी यास भरणाकामी दिली असल्याचे दिसून येते. तसेच प्रस्तुत प्रकरणातील जप्ती पंचनाम्याचे अवलोकन केले असता, आरोपीच्या ताब्यातुन जप्त झालेली रक्कम ही प्रस्तुत अर्जदाराच्या मालकीचे असल्याचे नमुद आहे. यावरुन रोख रक्कम ही प्रथमदर्शनी अर्जदाराच्या

मालकीची असल्याचे दिसुन येते. तसेच प्रस्तुत रक्कमेचा अर्जदार व्यतिरीक्त अन्य कोणीही ताबा मागितलेला नाही. तसेच इतर कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीचा रक्कम परत करण्यास आक्षेप नाही. सदर मुद्देमाल रोख रक्कम असल्याने, ती अर्जदाराच्या दैनंदिन कामाकाजासाठी आवश्यक आहे. तसेच रोख रक्कम पोलीस स्टेशनला पडून राहिल्यास गहाळ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदरचे रकमेचा अंतरिम ताबा अर्जदाराला देणे सोयीस्कर होईल. म्हणून हे न्यायालय खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१. अर्ज खालील अटी व शर्तीवर मंजुर करण्यात येतो.

०२. जप्त रक्कम

| अ.क्र. | मुद्देमालाची माहिती |
|---|---|
| (१) | रोख रक्कम एकुण ३३,०००/- रुपये. |

ही अर्जदाराला रूपये **३५,०००/-** (अक्षरी पस्तीस हजार रुपये फक्त) च्या सुप्रतनामा बंधपत्रावर तात्पुरत्या स्वरूपात देण्यात येते. अर्जदाराने स्वत: सुप्रतनामा खालील अटी व शर्ती नमुद करून या न्यायालयात द्यावा.

०३. प्रस्तुत मुद्देमाल हा प्रलंबित प्रकरणाच्या निकाला अंती अर्जदाराच्या मालकीचे नसल्याचे सिध्द झाल्यास, अर्जदार सदर रक्कम न्यायालयात परत करेल या अटीवर रोख रक्कमेचा ताबा तात्पुरत्या स्वरुपात अर्जदारास देण्यात यावा.

०४. तपासी अंमलदार पोलीस स्टेशन, देचलीपेठा यांनी वरील मुद्देमाल अर्जदार बायक्का चंद्रय्या सिडाम, रा. देचलीपेठा, तह. अहेरी, जि. गडचिरोली यांच्या ताब्यात द्यावे व त्याबाबतचा पंचनामा तयार करुन अहवाल न्यायालयात दाखल करावे.

०५. अर्जदाराने प्रस्तुत प्रकरणात वर दिलेल्या अटी व शर्तीचा भंग केल्यास सुप्रतनाम्याची रक्कम व्यतिरिक्त रुपये **३५,०००/-** (अक्षरी पस्तीस हजार रुपये फक्त) दंड स्वरुपात न्यायालयात भरुन देण्यास जबाबदार राहिल.

०६. सदर अर्जाचे केस पेपर व आदेशाची प्रत तपासी अंमलदार/फौजदारी शिरस्तेदार यांनी आरोपपत्रासोबत दाखल करावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by UNMESH BALU SHRIRAM
Date: 2026.04.06 18:48:51 +0530

**(उन्मेश बा. श्रीराम)**

दिनांक:- ०४/०४/२०२६.

न्यायदंडाधिकारी (प्रथम श्रेणी),
सिरोंचा.

**प्रमाणपत्र**

मी शपथेवर सांगतो की, पी.डी.एफ. आदेशामधील मजकूर हा मुळ आदेशातील मजकुराप्रमाणे शब्द-न-शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | विट्ठल विश्वांभर मिट्ठेवाड<br>लघुलेखक (श्रेणी-३) |
| न्यायालयाचे नाव | : | दिवाणी व फौजदारी न्यायालय,<br>सिरोंचा. |
| आदेशाची तारीख | : | ०४/०४/२०२६. |
| मा.पिठासीन अधिकारी यांनी आदेशावर सही केल्याची तारीख | : | ०४/०४/२०२६. |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | : | ०६/०४/२०२६. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by VITHAL VISHWAMBHAR MITHEWAD
Date: 2026.04.06 18:51:31 +0530

(विट्ठल विश्वांभर मिट्ठेवाड)
लघुलेखक (श्रेणी-३)
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
सिरोंचा.